**स. क्रि.केस नं. ८७३/२०२४**
शासन वि.निलेश प्रकाश बुणे
**निशाण नं. १०/क**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी.</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

| | |
|---|---|
| माझे नांव | –संतोष रमेश समुद्रे |
| वय | – २१ वर्षे |
| धंदा | – सेंट्रींग काम |
| राहणार | – वारणा कोडोली. |

**<u>सरतपास सहायक सरकारी वकील सौ. डी. बी. पाटील यांचेतर्फे शपथेवर सुरु,</u>**

१. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०७.०४.२०२४ रोजी मला कोडोली पोलिसांनी गिरोली ते दाणेवाडी जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला मोकळया जागेत पंचनाम्याकरिता बोलविले होते. त्या दिवशी मी, सुरज कांबळे व पोलीस हे तेथे गेल्यानंतर एक इसम दारू पीत होते असे घडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, तेथे पोलिसांनी माझ्या समक्ष पंचनामा केला होता. आता मला दाखविण्यात आलेल्या पंचनाम्यावरील सही माझी नाही.

**(साक्षीदार अभियोग पक्षास पुरक उत्तरे देत नसल्यामुळे सहा.अभियोक्ता यांना उलट प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येत आहे. )**

२. मला दाखविण्यात आलेल्या पंचनाम्यावरील अनु. क्र. १ वरील नाव व पत्त्याबाबतचा मजकूर हा बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की,त्या दिवशी मला व सुरज कांबळे यास पंचनाम्याकरिता पोलिसांनी बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी मी व दुसरे पंच सुरज कांबळे व पोलीस स्टाफ हे छापा टाकण्याकरिता गिरोली ते दाणेवाडी रस्त्यालगत असलेल्या घटनास्थळी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही त्या ठिकाणी गेल्यानंतर दोन इसम दारुचे सेवन करत असताना दिसून आले.

३.	हे म्हणणे खरे नाही की,आम्ही गाडीतून उतरून घटनास्थळी चालत जात असताना त्यातील इसमाना चाहूल लागली व ते पळत जाण्याचा प्रयत्न करत असताना एकास पकडले. हे म्हणणे खरे नाही की, सदर इसमास नाव विचारले असता त्याने त्याचे नाव निलेश प्रकाश बुणे रा. वाडी रत्नागिरी असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, सदर इसमाकडील बॉटल व ग्लास तपासले असता त्यास आंबट व उग्र वास येत होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर इसमाकडे दारुची एक १८० मिलीची बाटली त्यामध्ये शिल्लक दारू ४५ मिली व प्लॅस्टीकचा ग्लास असे साहित्य जप्त करून त्याचा पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, सदर पंचनामा पूर्ण करून मला वाचून दाखविण्यात आला व तो पूर्ण वाचून मी त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे माझ्या कामाच्या निमित्ताने ओळखीचे इसम आहेत व त्यांना वाचविण्याच्या हेतूने मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री. ए. ए. बचे पाटील यांचेमार्फत सुरु,**

४.	हे म्हणणे खरे आहे की, माझे समक्ष कोणताही पंचनामा झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की,पंचनाम्यामध्ये असलेल्या नावाव्यतिरिक्त मला अन्य कोणतीही माहिती नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

सही/-

**के. दि. काकतकर**

प्रथवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा.

पन्हाळा

दि. १४.११.२०२५